राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

## शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २६ मार्च, २०१८.

**वाचा :-**

१) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रिमिनल रिट पिटीशन क्र. २११०/२०१४ वरील दि.१३.८.२०१४, दि.२१.१०.२०१५, दि.२४.०२.२०१६, दि.२१.०९.२०१६ व दि.३०.११.२०१६ रोजीचे आदेश.

२) मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ५३९/१९८६ वरील दि.२४.७.२०१५ रोजीचा न्यायनिर्णय.

३) सचिव,माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.३७/१८, दि.४.३.२०१३.

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२१/७२७२/न्या.प्र.सीसीटीव्ही /२०३/२०१४, दि.२७.०१.२०१५.

५) गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३,दि.२३.११.२०१५.

६) शासन निर्णय, उदयोग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र. क्र. ८२/भाग-III/उदयोग-४, दि.३०.१०.२०१५ व दि.०१.१२.२०१६.

७) सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग,शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६-३६१५ /प्र.क्र.२८६/३९ दिनांक ०९.०८.२०१६

८) गृह विभाग शासन निर्णय क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-१/पोल-३, दिनांक ०६.०१.२०१७.

९) राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.२.२०१८ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

लिओनार्ड झेविअर वल्दारीस व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमिनल रिट पिटीशन क्र. २११०/२०१४ दाखल केली आहे. मा. उच्च न्यायालयाने विषयांकीत याचिकेमध्ये दि.१३.८.२०१४,दि.२४.०२.२०१६ व दि.३०.११.२०१६ रोजी आदेश पारित केले आहेत. मा. मुंबई उच्च न्यायालयाने पोलीस कोठडीतील मृत्यु रोखण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांमधील प्रत्येक कॉरीडॉर, रुम व लॉकअप यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आदेशित केले आहे.तसेच डि.के.बसू व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये पश्चिम बंगाल राज्य आणि इतर यांचेविरुध्द क्रिमीनल रिट पिटीशन

क्र.५३९/१९८६ या प्रकरणी दि.२४.०७.२०१५ रोजी निर्णय दिला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविणेबाबत निदेश दिलेले आहेत. ही बाब विचारात घेवून प्रायोगिक तत्वावर पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अधीनस्त २५ पोलीस ठाण्यांमधील चार्ज रुम, लॉकअप, मार्गिका, स्टेशन हाऊस इ. पाच ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत उपरोक्त संदर्भाधिन क्र.५ येथे नमूद दिनांक २३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सर्व २५ पोलीस ठाण्यांमध्ये आदेशात नमूद ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची प्रक्रिया पुर्ण झाली आहे.

प्रस्तूत न्यायालयीन प्रकरणी दि.३०.११.२०१६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखालील एकूण २५ पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतची कार्यवाही मा.न्यायालयाच्या दि.१३.०८.२०१४ व दि.२४.०२.२०१६ च्या आदेशानुसार करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे निदेश मा.न्यायालयाने दिले. मा.न्यायालयाच्या सदर आदेशानुसार पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिनस्त २५ पोलीस ठाण्यांमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचे दालन, पोलीस स्थानकांचा संपूर्ण परिसर व सर्व कक्षासाठी (महिला कक्ष व विश्रांती कक्ष वगळून) एकुण ४१० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्याबाबतची पुढील कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत सुरु आहे. तथापि मा.न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी उपरोक्त संदर्भाधिन क्र.४ येथे नमूद दि.२७.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी एकूण रु.८८.९० कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. तसेच सदर प्रस्ताव विचारात घेवून उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२७.०२.२०१८ रोजीच्या बैठकीत मा. न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील ११०० पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी येणाऱ्या रु.७२.६० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शिफारस करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील ११०० पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी येणाऱ्या रु.७२.६० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील ११०० पोलीस ठाण्यांमध्ये मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी येणाऱ्या रु.७२,६०,००,०००/- (अक्षरी रुपये बाहत्तर कोटी साठ लाख) एवढ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यातील ११०० पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही दोन टप्प्यात करण्यात यावी. त्यापैकी पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाने स्मार्ट पोलीस ठाणे म्हणून निवड केलेल्या राज्यातील ५०० पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी व दुसऱ्या टप्प्यात राज्यातील उर्वरीत पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

३. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये सीसीटीव्ही प्रणाली कार्यान्वित करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे नमूद बाबी विचारात घेऊन करण्यात यावी :-

| Sr.No | Design Consideration | Requirement |
|---|---|---|
| 1 | Number and type/technology of cameras | ➢ Number of cameras may vary from 7 cameras to 15 cameras per police station as per the size of police station.<br>➢ Type of cameras will be mix of following:-<br>• Varifocal indoor dome cameras for indoor surveillance.<br>• Varifocal outdoor bullet camera for outdoor environment.<br>• Pan tilt zoom camera for main entry/exit.<br>➢ All cameras to be IP based and should have inbuilt IR illuminator. |
| 2 | Type of locations where camera has to be installed | 1. Entry/Exit Gate<br>2. Police Station Entry<br>3. Passage<br>4. Station House<br>5. Officers Room<br>6. Charge Room<br>7. Lockup<br>8. Other Room if any |
| 3 | Location of viewing center and IT infrastructure | Viewing center to be setup in the room of Police Station in charge 32" inch LED TV connected with NVR. |
| 4 | Days of storage | ➢ 365 days for camera installed in Lockup<br>➢ 90 days for all other cameras.<br>➢ If any incident has been reported, the video footage for same has to be kept for longer duration i.e. more than year and same has to be written on DVD through External/Internal DVD writer. |
| 5 | UPS backup | Minimum backup of 1 Hour. |

| Sr.No | Design Consideration | Requirement |
|---|---|---|
| 6 | Cyber Security | In order to protect the video against any tampering, desired protection layer to be added on the recorded and exported video. |
| 7 | Warranty and AMC | Minimum warranty for one year and AMC for additional 4 years. |

४. सचिव, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय यांनी संदर्भाधीन क्र.०३ वरील दि.४.३.२०१३ चे पत्रान्वये विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार सदर पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी. मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि.१३.८.२०१४ रोजी पारित केलेल्या निर्देशांमध्ये सदर चित्रीकरण एक वर्षे कालावधीकरीता जतन करण्यात यावे असे नमूद केलेले आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि.४.३.२०१३ चे पत्रान्वये विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांमधील, "चित्रीकरण कालावधी एक वर्षे कालावधीसाठी जतन करणे" या एकमेव बदलासह उर्वरीत सर्व मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करावा. उपरोक्त संदर्भाधिन क्र. ७ येथे नमूद सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभागाच्या दिनांक ०९.०८.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सदर पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत करण्यात यावी.

५. पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत लागणाऱ्या साधनसामग्रीची खरेदी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधीन क्र.६ येथील नमुद दि.३०.१०.२०१५ व दि.०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निविदा/खरेदी धोरणानुसार करण्यात यावी.

६. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च हा "मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२ यंत्रसामग्री साधनसामग्री"या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२७.०२.२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१८२३२४५९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.03.27 18:26:10 +05'30'

**(कैलास गायकवाड)**
उप सचिव, गृह विभाग

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
२. मा. विरोधीपक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे खाजगी सचिव.
३. मा. राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, गृह (विशेष), मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
११. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१३. महालेखालपाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. श्रीमती मानकुंवर देशमुख, अति. सरकारी अभियोक्ता, मुंबई उच्च न्यायालय (ए. एस.), मुंबई.
१७. वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई-३२
१८. सहसचिव, (पोल-१४) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१९. निवडनस्ती, पोल-३

*****